laharashtra State Board of
econdary & Higher Secondary Education
R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
alchitrawani, Behind Agharkar Research
stitute, Bhamburda, Shivajinagar,
une-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए,
फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणीशेजारी,आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

ईमेलव्दारे
तातडीचे

क.रा.मं./प्रकाशन/संशोधन/3276
पुणे 411 004.
दिनांक – 07 जुलै, 2022

प्रति,
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळ
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/
अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/
अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी.

विषय – आयुक्त शिक्षण कार्यालयामार्फत सुरु होणारे त्रैमासिक शिक्षणगाथा ची माहिती सर्व शाळा /क.म.वि. यांना देणेबाबत.
संदर्भ – शिक्षण आयुक्तालयाचे पत्र क.आस्था क/संकीर्ण/141/3735, दि.24/6/2022.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करत असताना, महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमधील शिक्षक, विदयार्थी आणि पालक यांचेशी असलेल्या आपुलकीच्या अतुट नात्याने, सर्वांच्या विविध सृजनशील विचार कृतींची देवाणघेवाण एकमेकांशी प्रभावीपणे पोहचविणे, शैक्षणिक कार्यक्षेत्रातील उत्तम कार्य करणा–या अधिकारी/कर्मचारी/शिक्षकशिक्षकेतर वृंद यांच्या कार्याचा लेखा–जोखा, त्रैमासिकाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने माहे 15 ऑगस्ट, 2022 पासून 'शिक्षणगाथा' हे त्रैमासिक मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत सुरु करण्यात येत आहे.

या त्रैमासिकामध्ये शिक्षण विभागातील प्रगतीशील घडामोडींची माहिती वाचकांना होणार असून, यामध्ये आपापल्या कार्यक्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा लेखजोखा, यशस्वी प्रयोग, कृतीचे लेख, चित्रफिती, ध्वनीफिती, कलात्मक चित्रे, छायाचित्रे, आकृतीसह शिक्षण विभागासमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी काही ठळक व व्यवहार्य उपाययोजना/उपक्रम असल्यास ते विशद करणारे लेख educomshikhangantha@gmail.com या ईमेलवर पाठविण्याबाबत आपल्या विभागीय मंडळ कार्यकक्षेतील मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविदयालयांना कळविण्यात यावे.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ,पुणे 4.

क्र. कोविमं / 971
दिनांक :- 08/07/2022

प्रति,
मुख्याध्यापक / प्रचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा/सांगली/कोल्हापूर.

विषय :- आयुक्त शिक्षण कार्यालयामार्फत सुरु होणारे त्रैमासिक शिक्षणगाथा ची माहिती सर्व शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांना देणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा.आयुक्त शिक्षण कार्यालयामार्फत सुरु होणारे त्रैमासिक शिक्षणगाथा ची माहितीचे सोबतचे परिपत्रक आपल्या माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक,विद्यार्थी व पालक तसेच सर्व संबधितांना निदर्शनास आणून देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

(दत्तात्रय शंकर पोवार)
प्र. विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर